ePaper

# निवडणूक निकाल 'इफेक्ट'! शेअर बाजाराची फिनिक्स भरारी

| वर्ष - 8 | अंक -137 | UDYAM-MH-26-0158827 |





महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 25 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- विराट कोहलीचे ऐतिहासिक शतक!
- लायनने टाकलेल्या जाळ्यात अडकला पंत
- विभाजनवादी राजकारणाचा पराभव
- हेमंत सोरेन झारखंडचे नवे मुख्यमंत्री

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने होण्याची शक्यता

# पालिका निवडणुका लवकरच ?

## » सुप्रीम कोर्टात निर्णय झाल्यास पावसाळ्यापूर्वी शक्यता

। पुणे । महाईन्यूज

**विधानसभेची निवडणूक पार पडली असून, सत्ताधारी 'महायुती' ला मोठे यश मिळाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने घेतल्या जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयातील ३० याचिकांवर एकत्रित निर्णय झाल्यास महापालिकांसह राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पावसाळ्यापूर्वी घेतल्या जातील, असा दावा उच्चपदस्थ सूत्रांनी केला आहे.**

महाविकास आघाडी आणि त्यानंतर महायुती सरकारने आपल्या कार्यकाळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या. सध्याच्या परिस्थितीत ९५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजीही आहे. या पार्श्वभूमीवर या रखडलेल्या निवडणुका तातडीने घेण्याबाबत कार्यकर्त्यांकडून दबाव वाढत असल्याने या निवडणुका घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. महायुतीला घवघवीत यश मिळाल्याने या निवडणुका तातडीने घेतल्या जातील, अशी अपेक्षाही कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. तत्कालीन देवेंद्र फडणवीस सरकारने २०१७मध्ये महापालिकांच्या निवडणुका या चार सदस्यीय प्रभागरचनेनुसार लढविल्या होत्या. भाजपला त्याचा राज्यभर फायदा झाला होता. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर महाविकास आघाडी सरकारने तीन सदस्यीय प्रभाग रचना करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महापालिका निवडणुकांची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. दरम्यान, राज्यात पुन्हा सत्तांतर झाल्यानंतर शिंदे सरकारने आगामी महापालिका निवडणुका तीन सदस्यीय प्रभाग रचनेनुसार होतील, हा निर्णय कायम ठेवला होता. मात्र, त्याच वेळी महाविकास आघाडीने वाढविलेली सदस्य संख्या कमी केली होती. त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असून, त्यावर अद्याप निर्णय आलेला नाही. ही याचिका प्रलंबित असतानाच शिंदे सरकारने तीन सदस्यीय प्रभाग रचनेच्या निर्णयात बदल करून, ही रचना चार सदस्यांची केली आहे.




### नव्याने प्रभाग रचना

राज्य सरकारने २०२२मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महापालिकेत निवडून आलेल्या सदस्यांनी किमान संख्या १६१ इतकी, तर कमाल संख्या १७५ इतकी असेल, असे निश्चित केले होते. पहिल्या ३० लाख लोकसंख्येसाठी १६१, तर त्यापुढील एक लाख लोकसंख्येसाठी एक नगरसेवक वाढणार आहे. हा निर्णय अद्याप कायम आहे. पुणे महापालिकेची २०११च्या जनगणनेनुसार ३५ लाख ५६ हजार ८२४ इतकी लोकसंख्या आहे. त्यामुळे पुणे महापालिकेतील नगरसेवकांची संख्या १६६ होणार आहे.

### झेडपी निवडणुकांची प्रतीक्षा

पुणे महानगरपालिकेची मुदत संपुष्टात आल्यानंतर त्या पाठोपाठ 'मिनी मंत्रालय' समजल्या जाणाऱ्या पुणे जिल्हा परिषदेची मार्च २०20 मध्ये मुदत संपली. त्यानंतर जिल्हा परिषदेवर आतापर्यंत 'प्रशासकराज' सुरू आहे. लोकसभा निवडणुकांपूर्वी महापालिकेसोबत जिल्हा परिषदेच्या निवडणुका लागतील, अशी शक्यता वर्तविली जात होती. मात्र, महायुती सरकारने महापालिकांसह जिल्हा परिषदेच्या निवडणुकांकडे दुर्लक्ष केले. गेल्या दोन अडीच वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील विकास कामांना 'खो' लागल्याचा दावाही करण्यात आला. दुसरीकडे, सामान्य नागरिकांची जिल्हा परिषदेत कामे लवकर होत नसल्याच्या तक्रारी वाढल्या. त्यामुळे माजी सदस्यांकडून वारंवार जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्याची मागणी करण्यात येत होती. पुण्यासह राज्यातील सुमारे २५ जिल्हा परिषदांच्या निवडणुका अद्याप झाल्या नाहीत. त्यामुळे लोकसभा, विधानसभेपाठोपाठ या निवडणुका कधी होतील याची प्रतीक्षा सर्वांनाच होती. आता महायुतीचे सरकार राज्यात येत आहे. त्यामुळेच जिल्हा परिषदेच्या निवडणुका येत्या वर्षात लवकर घ्याव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# कोण होणार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री?

## » निवडणुकीतील विजयानंतर महायुतीत खल; शीर्षस्थ नेते घेणार निर्णय

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

विधानसभा निवडणुकीतील महाविजयानंतर आता राज्याची धुरा कुणाच्या खांद्यावर द्यायची, हा महायुतीसमोर पेच आहे. भाजपला १३२ जागांवर विजय मिळाल्यावर पुन्हा एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केल्यास त्याची तीव्र प्रतिक्रिया भाजप आमदार व कार्यकर्त्यांमध्ये उमटण्याची शक्यता आहे. त्याचवेळी शिवसेनेला ५७ जागा मिळाल्याने शिंदे, फडणवीस यांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता भाजप मोठा पक्ष, पण शिंदेंचा हातभारही महत्त्वाचा जबाबदाऱ्यांबाबतचा निर्णयही दिल्लीतूनच एकनाथ शिंदे यांचा या विजयाला लागलेला हातभारही दुर्लक्षित करता येण्याजोगा नसल्याने याचा निर्णय दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा या शीर्षस्थ नेत्यांकडूनच घेतला जाईल, असे भाजपमधील ज्येष्ठ नेत्याने सांगितले.



### महिला आमदारांची संख्या घटली

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत केवळ २१ महिला आमदार निवडून आल्या आहेत. त्यातील १४ महिला या केवळ भाजप या एका पक्षातील आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस-शप पक्षाच्या १० आमदारांमध्ये एकही महिला आमदार नाही. सन २०१९मध्ये राज्यभरातून २६ महिला आमदार झाल्या होत्या.

# पुण्यातील विमानतळ नापासवरून पास!

## विमानतळावरील सुविधांच्या दर्जात दिवसेंदिवस वाढ होत आहे

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे विमानतळावरील प्रवासी सुविधांच्या दर्जात दिवसेंदिवस वाढ होत आहे. यामुळे विमानतळ सेवा गुणवत्ता निर्देशांकात पुणे विमानतळ ७६ वरून ७४ व्या स्थानी आले आहे. असे असले तरी काही सुविधांमध्ये पुणे विमानतळाचा दर्जा घसरला आहे. केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे पुण्यातील असल्याने पुणे विमानतळावरील प्रवासी सुविधांमध्ये आणखी सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**




एअरपोर्ट्स कौन्सिल इंटरनॅशनलच्या वतीने सर्वेक्षण करून विमानतळ सेवा गुणवत्ता (एएसक्यू) निर्देशांक जाहीर केला जातो. जगभरातील ९५ देशांतील ४०० विमानतळांचे सर्वेक्षण यासाठी केले जाते. यात देशातील १४ विमानतळांचा समावेश आहे. यंदा जुलै ते सप्टेंबर या तिमाहीतील सर्वेक्षणाच्या आधारे पुणे विमानतळ या निर्देशांकात ७४ व्या स्थानी आले आहे. पुणे विमानतळाला ५ पैकी ४.८४ गुण मिळाले आहेत.त्याआधीच्या एप्रिल ते जून तिमाहीत पुणे विमानतळ ७६ व्या स्थानी होते आणि विमानतळाला ४.८१ गुण मिळाले होते. त्यामुळे विमानतळावरील प्रवासी सुविधांचा दर्जा सुधारल्याचे समोर आले आहे. सेवा गुणवत्ता निर्देशांकात विमानतळावरील ३१ महत्त्वाच्या गोष्टींचा विचार केला जातो. त्यात प्रवेशद्वाराजवळ बसण्यासाठी आसने, प्रवाशांना सहजपणे त्यांचा मार्ग सापडणे, विमानांच्या उड्डाणाची माहिती व्यवस्थित मिळणे, विमानतळ ते टर्मिनल अंतर कमी असणे, विमानतळ कर्मचाऱ्यांची सौजन्यशीलता, वाय-फाय सेवा गुणवत्ता, चार्जिंग स्थानकांची उपलब्धता, मनोरंजन अथवा विश्रामासाठी पर्याय, स्वच्छतागृहे, आरोग्यासंबंधी सुरक्षिततेची काळजी, स्वच्छता आणि वातावरण या इतर गोष्टींचा समावेश आहे. पुणे विमानतळाचे स्थान जुलै ते सप्टेंबर तिमाहीत ३१ पैकी ३ सेवांमध्ये घसरले आहे. त्याआधी एप्रिल ते जून तिमाहीत पुणे विमानतळाचे स्थान १६ सेवांमध्ये घसरल्याने ते नापास ठरले होते. आता पुणे विमानतळाने पास होण्याच्या दिशेने वाटचाल केली आहे.पुणे विमानतळ हे देशातील पहिल्या दहा व्यग्र विमानतळांपैकी एक आहे. सहजपणे प्रवाशांना विमानतळावर पोहोचता यायला हवे. त्यामुळे मेट्रोसेवेला विमानतळाशी जोडावे लागेल. त्यातून प्रवाशांचा वेळ वाचेल आणि त्यांचा प्रवास सुकर होईल. याचबरोबर आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या कमी असतानाही पारपत्र तपासणीला लागणारा विलंब कमी करण्याची आवश्यकता आहे.एअरपोर्ट्स कौन्सिल इंटरनॅशनलच्या वतीने सर्वेक्षण करून विमानतळ सेवा गुणवत्ता (एएसक्यू) निर्देशांक जाहीर केला जातो. सेवा गुणवत्ता निर्देशांकात विमानतळावरील ३१ महत्त्वाच्या गोष्टींचा विचार केला जातो. त्यात प्रवेशद्वाराजवळ बसण्यासाठी आसने, प्रवाशांना सहजपणे त्यांचा मार्ग सापडणे, विमानांच्या उड्डाणाची माहिती व्यवस्थित मिळणे, विमानतळ ते टर्मिनल अंतर कमी असणे, विमानतळ कर्मचाऱ्यांची सौजन्यशीलता, वाय-फाय सेवा गुणवत्ता, चार्जिंग स्थानकांची उपलब्धता, मनोरंजन अथवा विश्रामासाठी पर्याय, स्वच्छतागृहे, आरोग्यासंबंधी सुरक्षिततेची काळजी, स्वच्छता आणि वातावरण या इतर गोष्टींचा समावेश आहे. पुणे विमानतळाचे स्थान जुलै ते सप्टेंबर तिमाहीत ३१ पैकी ३ सेवांमध्ये घसरले आहे. त्याआधी एप्रिल ते जून तिमाहीत पुणे विमानतळाचे स्थान १६ सेवांमध्ये घसरल्याने ते नापास ठरले होते.

> पुणे विमानतळ हे देशातील पहिल्या दहा व्यग्र विमानतळांपैकी एक आहे. सहजपणे प्रवाशांना विमानतळावर पोहोचता यायला हवे. त्यामुळे मेट्रोसेवेला विमानतळाशी जोडावे लागेल. त्यातून प्रवाशांचा वेळ वाचेल आणि त्यांचा प्रवास सुकर होईल. याचबरोबर आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या कमी असतानाही पारपत्र तपासणीला लागणारा विलंब कमी करण्याची आवश्यकता आहे.
>
> **-धैर्यशील वंडेकर,** हवाई वाहतूकतज्ज्ञ

# वारजे पुलाजवळ गॅस टँकर उलटला

## चार ते पाच किलोमीटर वाहनांच्या रांगा; सायंकाळनंतर वाहतूक सुरळीत

। पुणे
।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई-बंगळुरू बाह्यवळणमार्गावरील वारजे पुलाजवळ गॅस वाहतूक करणारा टँकर उलटल्याची घटना रविवारी सकाळी घडली. टँकर उलटल्यानंतर बाह्यवळण मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. अखेर सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास उलटलेला ठँकर क्रेनच्या सहायाने बाजूला काढण्यात आला.**

त्यानंतर बाह्यवळण मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली.इण्डेन कंपनीचा गॅस टँकर मुंबईहून साताऱ्याकडे रविवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास निघाला होता. निघालेला होता. वारजे पुलाजवळील टाटा मोटर्स शोरूमसमोर टँकर उलटला. सुदैवाने समोरुन वाहन येत नव्हते. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. टँकरचालकासह मदतनीस सुखरुप बाहेर पडले. मात्र, या घटनेनंतर दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली होती. टँकर आकाराने मोठा असल्याने वाहतूक विस्कळीत झाली. वाहनांच्या रांगा लागल्याने या भागात कोंडी झाली. या घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलीस, अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, टँकरमध्ये गॅस असल्याने




बाजूला काढण्यासाठी अडचण आली. सुरक्षेच्या उपाययोजना करून वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली.वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागला. बाह्यवळण मार्गावर चार ते पाच किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. टँकर बाजूला काढण्यासाठी पाच क्रेन मागविण्यात आल्या. अखेर सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास टँकर बाजूला काढण्यात आला. त्यानंतर बाह्यवळण मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. टँकर सुरक्षितस्थळी हलविण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. टँकर नेमका कसा उलटला, याबाबतची माहिती मिळू शकली नाही. टँकर चालकाचे नियंत्रण सुटल्याने टँकर उलटल्याची शक्यता वारजे पोलिसांनी व्यक्त केली.. इण्डेन कंपनीचा गॅस टँकर मुंबईहून साताऱ्याकडे रविवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास निघाला होता. निघालेला होता. वारजे पुलाजवळील टाटा मोटर्स शोरूमसमोर टँकर उलटला. सुदैवाने समोरुन वाहन येत नव्हते. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती.

### कोंडीमुळे वाहनचालकांना मनस्ताप

टँकरचालकासह मदतनीस सुखरुप बाहेर पडले. मात्र, या घटनेनंतर दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली होती. टँकर आकाराने मोठा असल्याने वाहतूक विस्कळीत झाली. वाहनांच्या रांगा लागल्याने या भागात कोंडी झाली. या घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलीस, अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, टँकरमध्ये गॅस असल्याने बाजूला काढण्यासाठी अडचण आली. सुरक्षेच्या उपाययोजना करून वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली.वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागला. बाह्यवळण मार्गावर चार ते पाच किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

## अमित गोरखेंच्या कामगिरीची राज्यभर चर्चा

# महायुतीच्या विजयात अमित गोरखेंचा मोलाचा वाटा!

## महायुतीला वंचितांची निर्णायक मतं मिळवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल लागलेले आहेत. महायुतीला यामध्ये घवघवीत यश आल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यात महायुतीमध्ये भाजप हा मोठा भाऊ ठरल्याचं एकंदर आकडेवारीवरून स्पष्ट झालं आहे. अशात आता भाजपच्या या विजयामागे अनेक चेहरे आहेत त्यातील एक चेहरा आता समोर आला आहे. महायुतीच्या या विजयात विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी अनुसूचित जाती, आणि दलित, वंचितांची निर्णायक मतं मिळवण्यात मोलाचा वाटा उचलला असून त्यांनी का केलेल्या या कामगिरीची राज्यभर चर्चा सुरू आहे.**




नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदार अमित गोरखे यांनी बहुजन संवाद यात्रेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र पिंजून टाकला होता. या दौऱ्याच्या माध्यमातून गोरखे यांनी २३ जिल्हे, १५० हुन अधिक तालुके आणि ७२ विधानसभा मतदारसंघात जाऊन तेथील वंचित, मागासवर्गीय समाजातील सामान्य जनतेशी संवाद साधला. त्यांचे प्रश्न, समस्या जाणून घेतल्या. विरोधकांनी जो संविधान बदलण्याचा फेक नरेटिव्ह चालवण्याचा प्रयत्न केला त्याला कमी करण्याचा प्रयत्न केला. लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या अनेक नेत्यांचा संविधान बदलण्याच्या फेक नरेटिव्हमुळे पराभव झाला होता. हे नरेटिव्ह दलित अनुसूचित संख्या जास्त असणाऱ्या लोकसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात दिसून आलं. दलित, वंचित मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी आघाडीचा हा प्लॅन सक्सेसफुल झाला होता.

दरम्यान लोकसभेला जो संविधान बदलाचा नरेटीव्ह चालला. तोच नरेटीव्ह घेऊन विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी प्रचाराच्या रणधुमाळीत उतरली. मात्र हा नरेटिव्ह मोडून काढण्यात अमित गोरखे यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचं या निवडणुकीत पाहायला मिळलं. त्यांनी बहुजन संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यातील वंचितांचा विश्वास संपादित केला.

भाजपबद्दल संविधान बदलाच्या विषयीचा जो चुकीचा समज समाजात पसरवला गेला होता. तो त्या लोकांशी संवाद साधून त्यांच्या मनातून दूर करण्याचं महत्त्वाचं काम विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अमित गोरखे यांनी केल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळेच महायुतीच्या या घवघवीत यशात अमित गोरखे यांचा मोलाचा वाटा असल्याचं बोललं जात आहे. म्हणूनच आगामी काळात पक्षाकडून त्यांनी केलेले या महत्वपूर्ण कामगिरीची नक्कीच दखल घेतली जाईल यात कोणतीही शंका नाही.

### चर्चा तर होणारच...

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल लागलेले आहेत. महायुतीला यामध्ये घवघवीत यश आल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यात महायुतीमध्ये भाजप हा मोठा भाऊ ठरल्याचं एकंदर आकडेवारीवरून स्पष्ट झालं आहे. अशात आता भाजपच्या या विजयामागे अनेक चेहरे आहेत त्यातील एक चेहरा आता समोर आला आहे. महायुतीच्या या विजयात विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी अनुसूचित जाती, आणि दलित, वंचितांची निर्णायक मतं मिळवण्यात मोलाचा वाटा उचलला असून त्यांनी का केलेल्या या कामगिरीची राज्यभर चर्चा सुरू आहे.

## मावळात एकट्यानं किल्ला लढवला अन् विजय साधला

## महाविकास आघाडीने उचलून धरलेला 'मावळ पॅटर्न' फेल

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ मतदारसंघात महायुतीतील नाराजांनी उदयास आणलेला आणि महाविकास आघाडीने उचलून धरलेला 'मावळ पॅटर्न' फेल झाला आहे. पाच वर्षांत केलेल्या विकासकामांच्या आणि जनसंपर्काच्या जोरावर राष्ट्रवादी अजित पवार गटच्या सुनील शेळके यांनी पुन्हा विजयी गोल केला. स्वपक्षातील बंडखोरी, भाजपने थेट विरोधात केलेला प्रचार, महाविकास आघाडीने अपक्षाला दिलेला पाठिंबा अशा प्रतिकूल गोष्टींवर मात करत त्यांनी एकट्याने विजय खेचून आणला.**



मावळात अजित पवार गट आणि महायुतीतील नाराजांनी पाठिंबा दिलेल्या अपक्ष उमेदवारात लढत झाली. या लढतीकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले होते. येथे मागील वेळेपेक्षा ३२,३५८ म्हणजेच १.४३ टक्के मतदान जादा झाले होते. पूर्वी भाजपमध्ये असलेल्या आमदार शेळकेंनी २०१९ मध्ये उमेदवारी नाकारल्याने राष्ट्रवादीत प्रवेश केला आणि भाजपचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांना पराभूत केले. तेव्हापासून शेळके आणि भाजपमध्ये टोकाचा राजकीय संघर्ष सुरू झाला. यंदा भाजपने दावा केल्यानंतरही ही जागा अजित पवारांच्या गटाला मिळाली. त्यांनी शेळके यांच्यावर पुन्हा विश्वास टाकला आणि महायुतीत फूट पडली. मात्र, महायुतीतील नेते अपक्षासोबत तर मतदार शेळके यांच्यासोबत राहिल्याचे मतदानातून दिसून आले आहे.

### सुनील शेळकेंनी एकट्याने लढवला किल्ला

राष्ट्रवादी अजित पवार गटाचेच बापूसाहेब भेगडे यांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज भरला. भाजपचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे यांनी पदाचे राजीनामे देत भेगडे यांना जाहीर पाठिंबा दिला. महाविकास आघाडी, मनसेने स्वत:चा उमेदवार उभा न करता अपक्षाला पाठिंबा देत या 'पॅटर्न'ला बळ दिले. काही पदाधिकाऱ्यांचा अपवाद वगळता भाजपचे पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी, दिवंगत किशोर आवारे यांची जनसेवा विकास आघाडी, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे काही पदाधिकारी भेगडेंच्या प्रचारात उतरले होते. शेळके यांनी विश्वासू पदाधिकाऱ्यांना सोबत घेत किल्ला लढवला.

### शेळकेंच्या विजयाची कारणे

१) पाच वर्षांत केलेली विकासकामे
२) मतदारांशी असलेला थेट 'कनेक्ट'
३) लाडकी बहीण योजनेचे मतांमध्ये रूपांतर करण्यात आलेले यश
४) विकासकामांचा प्रचारात योग्य वापर

### भेगडेंच्या पराभवाची कारणे


१) मतदारांपर्यंत चिन्ह पोहोचवण्यात अपयश
२) उशिरा भूमिका घेतल्यामुळे मतदारांपर्यंत पोहोचण्यास उशीर
३) भाजपच्या पारंपरिक मतदारांनी फिरवलेली पाठ
४) शहरी मतदारांचा विश्वास संपादन करण्यात अपयश

# राष्ट्रीय आणीबाणीची पार्श्वभूमी




**इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या तेव्हा भारतात प्रचंड घुसळण सुरू झाली होती. देशाची आर्थिक अवस्था हलाखीची होती. यातून मार्ग काढणे गरजेचे होते. देशातील १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय इंदिरा गांधींनी १९६९ मध्ये घेतला. आर्थिक समतेच्या धोरणाला हा निर्णय पूरक होता; मात्र त्यावर अवलंबून असलेल्या लाभधारकांना हा धोका वाटला.**

त्यामुळेच या निर्णयाच्या विरोधात आर. सी. कूपर हे सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे भागधारक सर्वोच्च न्यायालयात गेले.मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्याचा युक्तिवाद कूपर यांच्या बाजूने केला गेला. सर्वोच्च न्यायालयाने कूपर यांच्या बाजूने निर्णय दिला. मग पुढच्या वर्षी इंदिरा गांधींनी संसदेत याचसाठी विधेयक आणले. न्यायालय विरुद्ध कायदेमंडळ अशा संघर्षाला सुरुवात झाली होती. यानंतर, संस्थानिकांना मिळत असलेल्या सरकारी तनख्यांच्या विरोधात (प्रिव्ही पर्स) इंदिरा गांधींनी निर्णय घेतला. संस्थानिकांमधील राजघराण्याच्या परिवारांना काही तनखा दिली जाईल, असे संस्थानांना विलीन करताना ठरले होते. हा अकारण खर्च असून आता सर्वांना समन्यायी पद्धतीने वागवले पाहिजे, यासाठी इंदिरा गांधींनी तनखे थांबवले; पण त्या विरोधातही सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. अखेरीस



या राजघराण्यातील व्यक्तींना तनखा देता कामा नये, यासाठी इंदिरा गांधींनी १९७१ साली २६ वी घटनादुरुस्ती केली. एकुणात इंदिरा गांधींच्या समाजवादी धोरणांमुळे भांडवलदार वर्ग आणि संस्थानिकांमधील विशेषाधिकार लाभलेले लोक नाराज झाले. दुसरीकडे १९७१ च्या युद्धात भारताने विजय मिळवलेला असला तरीही युद्धामुळे संकट निर्माण झाले. तेल प्रचंड महागले. कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमतीमुळे एकूणच महागाई वाढली. लोकांचे दैनंदिन जगणे कठीण झाले. १९७३-७४ मध्ये महागाईचा अभूतपूर्व भडका उडाला. त्यातच सरकारमधील भ्रष्टाचाराच्या विरोधात आंदोलन सुरू झाले. त्यामुळे गुजरातमधील राज्य सरकार विसर्जित करण्याची नामुष्की इंदिरा गांधींवर आलेली होतीच; पण पाठोपाठ बिहारमध्येही आंदोलन सुरू झाले. जयप्रकाश नारायण, जॉर्ज फर्नांडिस हे समाजवादी नेते या आंदोलनाचे नेतृत्व करत होते. आंदोलन प्रचंड पेटले. मोठी अस्वस्थता निर्माण झाली. इंदिरा गांधी एकाधिकारशाही वृत्तीच्या आहेत आणि त्यांचे शासन भ्रष्ट आहे, अशी टीका झाली. यात आणखी एक घटना घडली. इंदिरा गांधी १९७१ साली निवडून आल्या तेव्हा त्यांनी निवडणुकीत गैरप्रकार केले असा आरोप त्यांचे विरोधक राज नारायण यांनी केला होता. या खटल्याचा अलाहाबाद न्यायालयाने निकाल १९७५ साली दिला आणि पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधींचे संसदेचे सभासदत्व रद्द केले! त्याला दोन कारणे होती. पहिले कारण होते की 'इंदिरा गांधी यांच्या एका सभेला उभे केलेले स्टेज उत्तर प्रदेश सरकारच्या साहाय्याने उभे केले गेले' तर दुसरे कारण होते की 'इंदिरा गांधींनी यशपाल कपूर या सरकारी अधिकाऱ्यास निवडणूक प्रचारात सहभागी केले'. वास्तविक कपूर यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला होता; पण त्यांना कोणत्या तारखेपासून सेवामुक्त मानायचे, हा वादाचा मुद्दा होता. या दोन तांत्रिक कारणांनी पंतप्रधानांची थेट खासदारकी रद्द करण्यात आली. हा निर्णय वाजवी नव्हता, असे अनेक कायदेपंडित सांगतात. इंदिरा गांधींनीही या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. तोवर त्यांच्या विरोधातले आंदोलन प्रचंड पेटले होते. इंदिरा गांधींच्या राजकीय अस्तित्वाला धोका निर्माण झाला होताच, पण देशांतर्गत अशांतताही निर्माण झालेली होती. आणीबाणी लागू करण्यासाठीचे हे एक कारण संविधानाच्या अनुच्छेद ३५२ मध्ये होतेच. परकीय शक्तींचा अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न आहे, अशी इंदिरा गांधींची धारणा झाली होती. अखेरीस २५ जून १९७५ रोजी देशांतर्गत अशांततेमुळे राष्ट्रपतींनी आणीबाणीचा आदेश जारी केला. पहिले दोन्ही आणीबाणीचे प्रसंग बाह्य आक्रमणामुळे ओढवले होते. ही आणीबाणी देशांतर्गत अशांततेमुळे लागू केली गेली आणि देशाच्या इतिहासाला वेगळे वळण लागले.

## प्रासंगिक »

### समाजवादी रक्षाबंधन!

***धर्मभावना चेतवायच्या आणि त्यास कथित कल्याणकारी योजनांचे तेल ओतायचे, हा नवा खेळ राजकीयदृष्ट्या यशस्वी असेलही. पण तो जनतेच्या पैशावर सुरू आहे...***

"समाजवादाची समस्या ही की कधी ना कधी इतरांचे पैसे संपतात ", असे मागरिट थॅचर म्हणत. इतरांच्या पैशावर चालणारे धर्मार्थ कार्य म्हणजे समाजवाद असा त्याचा अर्थ. 'याचे काढायचे आणि त्याला द्यायचे' अशा अर्थाचा इंग्रजी वाक्प्रचारही हेच सांगतो. सरकारचे असे काही नसते; दोन्ही राज्यांत विधानसभा निवडणुका झाल्या आणि महाराष्ट्रापेक्षा कित्येक पटींनी लहान असलेल्या झारखंडात त्या दोन टप्प्यांत घेतल्या गेल्या. ते का यास काही उत्तर नाही. असो. महाराष्ट्रात भाजप सत्तेवर होता आणि झारखंडात तो सत्तेच्छू होता. महाराष्ट्रात अडीच वर्षांपूर्वी जे भाजपने केले ते झारखंडात तो अद्याप तरी करू शकलेला नाही. शिवसेना,अनेक नेते चौकशी यंत्रणांच्या नुसत्या निमंत्रणाच्या शक्यतेने गळपटले आणि भाजपवासी झाले. पण मुक्ती मोर्चाचे हेमंत सोरेन या मर्द मराठे म्हणवणाऱ्यांपेक्षा खरे शूर.

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा पोटनिवडणुकांचे काही निकाल धक्कादायक लागले आहेत. केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत अपेक्षेप्रमाणे मोठा विजय मिळवल्याने, प्रियंका गांधी या गांधी घराण्यातून संसदेत प्रवेश करणाऱ्या सहाव्या सदस्या ठरल्या.

# पोटनिवडणुकीने खुर्च्या बळकट!

नांदेड मतदारसंघात विजयासाठी काँग्रेसला कडवी लढत द्यावी लागली. काँग्रेसने लोकसभेतील दोन्ही जागा राखल्या, ही पक्षासाठी समाधानाची बाब. विधानसभेच्या पोटनिवडणुकांपैकी उत्तर प्रदेशमधील लढती अधिक उत्कंठापूर्ण ठरल्या होत्या. लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात भाजपची चांगलीच पीछेहाट झाली. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने ६२ जागा जिंकल्या होत्या.यंदा भाजदपचे संख्याबळ २९ने घटून भाजपला फक्त ३३ खासदारांवरच समाधान मानावे लागले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. त्यामुळे आता उत्तर प्रदेशातील विधानसभेच्या नऊ मतदारसंघांतील पोटनिवडणूक ही योगींनी अत्यंत प्रतिष्ठेची केली होती. या नऊपैकी भाजप आणि मित्रपक्षाला सात, तर समाजवादी पार्टीला दोन जागा मिळाल्या. २०२२च्या तुलनेत भाजपला दोन अधिक जागा मिळाल्या आहेत. यापैकी एक अल्पसंख्याक-



बहुल मतदारसंघ होता. तिथे भाजपला कधीच यश मिळाले नव्हते. पण मतांच्या ध्रुवीकरणाचा भाजपला फायदा झाला. योगींची 'बटेंगे तो कटेंगे' ही घोषणा पोटनिवडणुकांमध्ये भाजपला फायदेशीर ठरली.

याउलट 'पिछडा, दलित, अल्पसंख्याक' (पीडीए) हे समाजवादी पार्टीचे लोकसभेत यशस्वी ठरलेले सूत्र पोटनिवडणुकांमध्ये कामी आले नाही. लोकसभेपाठोपाठ पोटनिवडणुकांतही पराभव झाला असता तर योगी आदित्यनाथ यांच्या खुर्चीला धोका निर्माण झाला असता, पण वातावरण बदलण्यात योगी यशस्वी ठरले. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या हे म्हैसुरूमधील जमीन घोटाळ्याच्या आरोपांवरून अडचणीत आले आहेत. लोकायुक्त,ईडी या यंत्रणांच्या चौकशीचा ससेमिरा त्यांच्यामागे आहे. सिद्धरामय्या यांना बदलण्याची मागणी काँग्रेसमधून केली जाते. या पार्श्वभूमीवर राज्यातील विधानसभेच्या तिन्ही मतदारसंघांमधील पोटनिवडणुका जिंकून सिद्धरामय्या यांनी पक्षांतर्गत विरोधकांची तोंडे सध्या तरी बंद केली आहेत. विशेष म्हणजे बसवराज बोम्मई आणि कुमारस्वामी या दोन्ही माजी मुख्यमंत्र्यांनी प्रतिनिधित्व केलेल्या मतदारसंघांत उभय माजी मुख्यमंत्र्यांच्या मुलांचा काँग्रेसने पराभव केला. काँग्रेसने एक जागा कायम राखली, तर दोन अधिक जागा पक्षाच्या पदरात पडल्या आहेत. सिद्धरामय्या यांच्यासाठी हा निकाल महत्त्वाचा ठरतो. पश्चिम बंगालमध्ये 'आर. जी. कार रुग्णालया'तील एका महिला डॉक्टरवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याच्या प्रकरणी राग आजही धुमसतो आहे. हे प्रकरण मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासाठी डोकेदुखी ठरले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# लाडकी बहीण योजना सुपरहिट!

## लाडक्या बहिणींना 2100 रुपये मिळणार? पुढचा हप्ता कधी?

।मुंबई।

प्रतिनिधी । महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेम चेंजर ठरल्याचं निवडणुकीच्या निकालावरून स्पष्ट झालं आहे. जुलै २०२४ मध्ये अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ सादर केली आणि ही योजना तातडीने लागू करण्यात आली. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दर महिन्याला १,५०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार निवडणुकीपर्यंत या योजनेचे पाच हप्ते (७,५०० रुपये) पात्र महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत.**



दरम्यान,विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान, महायुतीने सादर केलेल्या जाहीरनाम्यात म्हटलं होतं की महायुती पुन्हा एकदा सत्तेत आल्यास लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिली जाणारी रक्कम वाढवणार आहोत. महायुती पुन्हा सत्तेत आल्यास महिलांना दर महिन्याला २,१०० रुपये दिले जातील. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत (२८८ पैकी २३५ जागा) मिळालं असून लवकरच महायुती सत्तास्थापन करणार आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पुढचा हप्ता कधी मिळणार याची प्रतीक्षा पात्र महिलांना आहे. तसेच, आगामी हप्त्याद्वारे १५०० रुपये दिले जाणार की २१०० रुपये असा प्रश्न सर्वांना पडला आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर भाष्य केलं आहे.लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिली जाणारी रक्कम १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. शिवसेनेच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करताना शिंदे म्हणाले, “ठरल्याप्रमाणे या योजनेअंतर्गत दिले जाणारे पैसे आता २१०० रुपये होतील. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुपरहिट झाली आहे. बहीण लाडकी आणि विरोधकांच्या छातीत भरली धडकी अशी काहीशी स्थिती झाली आहे”.शिवसेनेच्या (शिंदे) गटनेतेपदी निवड झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी पक्षातील महिला कार्यकर्त्या व काही सामान्य महिलांशी बातचीत केली. यावेळी महिलांना संबोधित करताना एकनाथ शिंदे म्हणाले, “आता तुम्हाला ठरल्याप्रमाणे १५०० ऐवजी २१०० रुपये दिले जाणार आहेत. आम्ही त्याचाही निर्णय घेत आहोत. तुम्ही मतदानावेळी जो निर्णय घेतला तो अतिशय यशस्वी झाला आहे आणि आम्हाला खूप मोठा विजय मिळाला आहे. मला पत्रकार नेहमी विचारायचे की तुमच्या किती जागा येणार? त्यावेळी मी त्यांना म्हणायचो, आम्हाला बहुमत मिळेल. परंतु, तुम्ही आम्हाला बहुमतापेक्षा जास्त जागा दिल्या आहेत. मी म्हणायचो आम्हाला थम्पिंग मेजॉरिटी मिळेल. परंतु, तुम्ही तर विरोधकांना डम्पिंग मध्ये टाकलं आहे.एकनाथ शिंदे म्हणाले, “लाडक्या बहिणींनी राज्यात इतिहास घडवला आहे आणि मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुपरहिट झाली आहे. मुख्यमंत्री बहीण लाडकी आणि विरोधकांच्या छातीत भरली धडकी अशी काहीशी स्थिती पाहायला मिळत आहे”. दरम्यान, यावेळी शिवसेनेच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकनाथ शिंदे पुन्हा एकदा मुख्यमंत्री व्हायला पाहिजेत अशा घोषणा दिल्या. “एकनाथ शिंदे पुढील पाच वर्षांसाठी मुख्यमंत्री झालेच पाहिजेत”, “महिलांचा आशीर्वाद असणार, एकनाथ शिंदे पुन्हा एकदा मुख्यमंत्री होणार”, “इडा पिडा टळू दे, लाडक्या भावाचं राज्य येऊ दे”, अशा घोषणा शिवसेना महिला कार्यकर्त्यांनी यावेळी दिल्या. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान, महायुतीने सादर केलेल्या जाहीरनाम्यात म्हटलं होतं की महायुती पुन्हा एकदा सत्तेत आल्यास लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिली जाणारी रक्कम वाढवणार आहोत. महायुती पुन्हा सत्तेत आल्यास महिलांना दर महिन्याला २,१०० रुपये दिले जातील. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत (२८८ पैकी २३५ जागा) मिळालं असून लवकरच महायुती सत्तास्थापन करणार आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पुढचा हप्ता कधी मिळणार याची प्रतीक्षा पात्र महिलांना आहे.

### एकनाथ शिंदे नेमकं काय म्हणाले?

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर भाष्य केलं आहे.लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिली जाणारी रक्कम १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. शिवसेनेच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करताना शिंदे म्हणाले, “ठरल्याप्रमाणे या योजनेअंतर्गत दिले जाणारे पैसे आता २१०० रुपये होतील. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुपरहिट झाली आहे. बहीण लाडकी आणि विरोधकांच्या छातीत भरली धडकी अशी काहीशी स्थिती झाली आहे”.शिवसेनेच्या (शिंदे) गटनेतेपदी निवड झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी पक्षातील महिला कार्यकर्त्या व काही सामान्य महिलांशी बातचीत केली.

# ज्यांनी त्रास दिला ते सगळे साफ झाले!

## थोरात, चव्हाण, देशमुखांच्या पराभवावर अशोक चव्हाणांचं विधान

।मुंबई। प्रतिनिधी ।महाईन्यूज।

**विधानसभा निवडणुकीचे निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाले. या निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीला मोठा पराभव पत्करावा लागला. तसेच या निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं. विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमतापेक्षा जास्त जागा मिळाल्यामुळे राज्यात महायुतीचं सरकार स्थापन होईल.**



याबाबत महायुतीच्या नेत्यांमध्ये सरकार स्थापनेबाबत मोठ्या हालचाली सुरु आहेत. महायुतीमधील मुख्यमंत्री कोण होईल? यावर सध्या तर्कवितर्क लावले जात आहेत.मात्र,असं असलं तरी या विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीसह काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला. त्यामुळे काँग्रेसवर सत्ताधारी पक्षांकडून जोरदार टीका करण्यात येत आहे.आता भाजपाचे खासदार अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या पराभूत झालेल्या नेत्यांवर हल्लाबोल केला आहे. “ज्यांनी-ज्यांनी त्रास दिला ते सगळे साफ झाले. लातूरला एक पडला आणि दुसरा निसटता निसटता निघाला”, असं म्हणत अशोक चव्हाण यांनी अमित देशमुख, धीरज देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात आणि नाना पटोले यांच्यावर टीका केली. त्यांच्या या विधानाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.“लातूरला एक पडला आणि दुसरा निसटता निसटता निघाला आहे आणि हे महाराष्ट्राचं नेतृत्व करणार? काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे माझ्यावर टीका करून गेले. भोकर, नांदेडकडे खूप लक्ष देत होते. पण ते निवडणुकीत फक्त १५० मतांनी निवडून आले आणि हे नेते महाराष्ट्राचं नेतृत्व करणार?

### अशोक चव्हाण काय म्हणाले?

त्या पक्षात काय राहिलंय? पृथ्वीराज चव्हाण हे माजी मुख्यमंत्री आणि बाळासाहेब थोरात हे माजी महसूलमंत्री. हे सगळे काल साफ झाले. सर्वजण निवडणुकीत पडले. ज्यांनी-ज्यांनी मला त्रास दिला ते सर्व साफ झाले. त्यामुळे मला त्रास देऊ नका”, असं अशोक चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना म्हटलं आहे.विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरातयांचा पराभव झाला आहे. आत्तापर्यंत त्यांनी आठवेळा निवडणूक लढवली होती आणि ते एकदाही हरले नव्हते. महाविकास आघाडीची सत्ता आल्यास पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होऊ शकतील, अशी शक्यताही बांधली जात होती. परंतु, त्यांचा दारुण पराभव झाला.

# विभाजनवादी राजकारणाचा पराभव!

## नरेंद्र मोदी यांची काँग्रेसवर टीका; भाजप मुख्यालयात जल्लोष

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाराष्ट्रातील महायुतीच्या विजयाने देशाला ‘एक है तो सेफ है’चा महामंत्र दिला आहे. मतदारांनी काँग्रेसच्या विभाजनवादी राजकारणाचा पराभव केला असून एकतेचा संदेश दिला आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी महायुतीच्या प्रचंड यशाचे कौतुक केले. राज्यातील विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने काँग्रेसप्रणित महाविकास आघाडीला धूळ चारली. राज्यात सलग तिसऱ्यांदा भाजप विजय झाली. भाजपच्या मुख्यालयातील झालेल्या विजयोत्सवात कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या भाषणामध्ये मोदींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना विजयाचे श्रेय दिले.**



भाजप वा भाजपआघाडीला सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवून देणारे महाराष्ट्र हे सहावे राज्य ठरले आहे. महाराष्ट्रातील जनतेने जात, धर्म, भाषा, प्रांत या भेदाभेदांच्या पलिकडे जाऊन भाजप व त्यांच्या मित्र पक्षांना मते दिली. दलित, आदिवासी, ओबीसींसह समाजातील प्रत्येक घटकांनी महायुतीला पाठिंबा दिला. त्यांच्या या भूमिकेमुळेच काँग्रेस व महाविकास आघाडीचा समाजामध्ये फूट पाडण्याचे कुटील कारस्थान अपयशी ठरले, असे मोदी म्हणाले.महाराष्ट्रामध्ये सलग तिसऱ्यांदा भाजप सर्वाधिक जागा मिळणारा पक्ष ठरला. यावेळी तर सर्व विक्रम मोडले गेले. ५० वर्षांनंतर पहिल्यादा निवडणूकपूर्व आघाडीला इतके भरघोस यश मिळाले आहे. गेल्यावेळीही युतीला मतदारांनी कौल दिला होता. पण, काही जणांच्या वेगळ्या इराद्यामुळे काही काळासाठी भाजपला सत्ता गमवावी लागली होती, असे म्हणत मोदींनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरे यांच्यावर टीकेची झोड उठवली. महायुतीचा महाराष्ट्रातील विजय हा विकास, सुशासन आणि समाजिक न्यायाचा विजय ठरला आहे. मतदारांनी काँग्रेसच्या घराणेशाहीला नाकारले आहे. काँग्रेसला देशाचा मूड काय आहे हेच समजलेले नाही. काँग्रेसला वास्तव कळलेले नाही. देश अस्थिर झालेला लोकांना मान्य नाही. देशाच्या हिताला लोकांनी प्राधान्य दिले आहे. संविधान, आरक्षणाबाबत काँग्रेसने लोकांची दिशाभूल केली आहे. या देशात एकच संविधान असेल. त्या आधारावर कोणताही पक्ष समाजामध्ये फूट पाडू शकत नाही, अशी ग्वाही मोदींनी दिली.सुमारे ५० मिनिटांच्या भाषणात मोदींनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्री फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर आदींना अभिवादन केले. मोदींनी मराठीतून महाराष्ट्रातील जनतेचेही आभार मानले.महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने मिळवलेले यश ऐतिहासिक असल्याचे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा म्हणाले. २०१९ मध्येही भाजप-शिवसेना युतीने विजय मिळवला होता. पण, उद्धव ठाकरेंनी आम्हाला धोका दिला. या निवडणुकीत राज्यातील मतदारांनी ठाकरेंनाच नाकारले. मोदी आणि महायुतीच्या मागे उभे असल्याचा स्पष्ट कौल लोकांनी दिला आहे. महाराष्ट्रातील विजयाने देशातील जनतेचा मूड स्पष्ट केला आहे, असेही नड्डा म्हणाले. भाजप वा भाजपआघाडीला सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवून देणारे महाराष्ट्र हे सहावे राज्य ठरले आहे. महाराष्ट्रातील जनतेने जात, धर्म, भाषा, प्रांत या भेदाभेदांच्या पलिकडे जाऊन भाजप व त्यांच्या मित्र पक्षांना मते दिली. दलित, आदिवासी, ओबीसींसह समाजातील प्रत्येक घटकांनी महायुतीला पाठिंबा दिला. त्यांच्या या भूमिकेमुळेच काँग्रेस व महाविकास आघाडीचा समाजामध्ये फूट पाडण्याचे कुटील कारस्थान अपयशी ठरले, असे मोदी म्हणाले.महाराष्ट्रामध्ये सलग तिसऱ्यांदा भाजप सर्वाधिक जागा मिळणारा पक्ष ठरला. यावेळी तर सर्व विक्रम मोडले गेले. ५० वर्षांनंतर पहिल्यादा निवडणूकपूर्व आघाडीला इतके भरघोस यश मिळाले आहे. गेल्यावेळीही युतीला मतदारांनी कौल दिला होता.

### काँग्रेसच्या घराणेशाहीला नाकारले

मोदींनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरे यांच्यावर टीकेची झोड उठवली. महायुतीचा महाराष्ट्रातील विजय हा विकास, सुशासन आणि समाजिक न्यायाचा विजय ठरला आहे. मतदारांनी काँग्रेसच्या घराणेशाहीला नाकारले आहे. काँग्रेसला देशाचा मूड काय आहे हेच समजलेले नाही. काँग्रेसला वास्तव कळलेले नाही. देश अस्थिर झालेला लोकांना मान्य नाही. देशाच्या हिताला लोकांनी प्राधान्य दिले आहे. संविधान, आरक्षणाबाबत काँग्रेसने लोकांची दिशाभूल केली आहे. या देशात एकच संविधान असेल. त्या आधारावर कोणताही पक्ष समाजामध्ये फूट पाडू शकत नाही, अशी ग्वाही मोदींनी दिली.सुमारे ५० मिनिटांच्या भाषणात मोदींनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्री फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर आदींना अभिवादन केले.

# हेमंत सोरेन झारखंडचे नवे मुख्यमंत्री

## सरकारचा शपथविधी सोहळा 28 नोव्हेंबर रोजी होणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**झारखंड विधानसभा निवडणुकीत हेमंत सोरेन यांच्या झारखंड मुक्ती मोर्च्याच्या बंपर विजयानंतर आता हेमंत सोरेन हे झारखंडचे नवे मुख्यमंत्री होणार हे निश्चित झाले आहे आणि त्यांचा शपथविधी 28 नोव्हेंबर रोजी होणार आहे. हेमंत सोरेन यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला असून, निवडणुकीतील विजयानंतर ते आता नवीन मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत.**



विधानसभेच्या 81 जागांपैकी झारखंड मुक्ती मोर्च्याच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने 56 जागा जिंकल्या आहेत. हा आकडा 41 च्या बहुमतापेक्षा 15 जागा जास्त आहे.झारखंडचे मुख्यमंत्री आणि झामुमोचे कार्याध्यक्ष हेमंत सोरेन म्हणाले की, नवीन सरकारचा शपथविधी सोहळा 28 नोव्हेंबर रोजी होणार आहे. आज आम्ही इंडिया आघाडी सरकार स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्या संदर्भात आम्ही राज्यपालांसमोर सरकार स्थापनेचा दावा केला आहे. मी त्यांना माझा राजीनामाही दिला आहे...काँग्रेस आणि आरजेडीचे प्रभारीही येथे उपस्थित होते. 28 नोव्हेंबर रोजी शपथविधी होणार आहे. त्याच वेळी, भाजप आघाडीने निवडणुकीत 24 जागा जिंकल्या आहेत, म्हणजे बहुमताच्या आकड्यापेक्षा 13 जागा कमी आहेत. विजयानंतर हेमंत सोरेन यांनी झारखंडच्या जनतेचे आभार मानले आणि जनतेची शक्ती पक्षापर्यंत आणणाऱ्या उपस्थित असलेल्या नेत्यांचेही मी आभारी असल्याचे सांगितले.

### आत्मविश्वासाने सरकार स्थापन करू

झामुमोच्या विजयाने राजधानी रांचीच्या रस्त्यांवर पोस्टर लावण्यात आले होते ज्यात लिहिले होते की त्यांनी सर्वांचे मन जिंकले आहे. शेरदिल सोरेन पुन्हा आले आहेत. हेमंत सोरेन हे झारखंडचे पहिले मुख्यमंत्री असतील जे सलग दुसरी निवडणूक जिंकून मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळतील. काँग्रेस नेत्यांनी हेमंत सोरेन यांची मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. झारखंड काँग्रेसचे माजी अध्यक्ष राजेश ठाकूर म्हणाले, याआधीही आमचे सरकार संकटात असताना आम्ही पूर्ण आत्मविश्वासाने सरकार स्थापन करू असे सांगितले होते.

# ‘ॲनिमल’च्या यशानंतर उपेंद्र लिमये पुन्हा गाजवणार बॉलीवूड!

रणबीर कपूर, अनिल कपूर, रश्मिका यांच्या प्रमुख भूमिका असलेला ‘ॲनिमल’ चित्रपट अलीकडेच प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डब्रेक कामगिरी करत तब्बल ९०० कोटींहून अधिक गल्ला जमावला आहे. ‘कबीर सिंग’ फेम संदीप रेड्डी वांगाने या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटातील प्रमुख अभिनेत्यांप्रमाणेच ‘ॲनिमल’ प्रदर्शित झाल्यावर मराठी अभिनेते उपेंद्र लिमये यांच्या फ्रेडी पाटील भूमिकेची देखील सर्वत्र चर्चा रंगली होती. ‘ॲनिमल’मध्ये उपेंद्र लिमये यांनी शस्त्रसाठा पुरवणाऱ्या डीलरची लहानशी भूमिका साकारली आहे. लहान असली तरीही ही भूमिका प्रेक्षकांसाठी चांगलीच लक्षवेधी ठरली. उपेंद्र यांच्या एन्ट्रीच्या सीनचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. याचे अनेक व्हिडीओ व फोटो सोशल मीडियावर व्हायरल



झाले होते.‘ॲनिमल’च्या यशानंतर बॉलीवूडप्रमाणे मराठी कलाविश्वात देखील उपेंद्र यांची जोरदार चर्चा रंगली होती. बिग बजेट सिनेमातील कामाचं भरभरून कौतुक झाल्यावर आता उपेंद्र लिमये पुन्हा एकदा बॉलीवूड गाजवण्यासाठी सज्ज झाले आहे. त्यांनी नव्या सिनेमाची पहिली झलक इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे.‘ॲनिमल’नंतर उपेंद्र लिमये हे अभिनेता कुणाल खेमू लिखित-दिग्दर्शित ‘मडगाव एक्स्प्रेस’ चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणार आहेत. यामध्ये अविनाश तिवारी, प्रतिक गांधी, दिव्येंदु यांच्या प्रमुख भूमिका असणार आहेत. ‘मडगाव एक्स्प्रेस’ हा बहुचर्चित चित्रपट २२ मार्चला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.उपेंद्र यांच्या एन्ट्रीच्या सीनचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. याचे अनेक व्हिडीओ व फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.

## रणबीरला चापट मारल्यानंतर...

गेल्या काही दिवसांमध्ये रणबीर कपूरच्या ‘ॲनिमल’ चित्रपटाची मोठ्या प्रमाणात चर्चा रंगल्याचे पाहायला मिळाले होते. संदीप वांगा रेड्डी दिग्दर्शित या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डतोड कमाई केली होती. या चित्रपटात रणबीरबरोबर साऊथची सुपरस्टार रश्मिका मंदानाची प्रमुख भूमिका होती. ‘ॲनिमल’मध्ये रश्मिकाने रणबीरच्या पत्नीची भूमिका साकारली आहे. दरम्यान, या चित्रपटात रश्मिका रणबीरला रागाच्या भरात चापट मारते, असा एक सीन दाखवण्यात आला आहे. या सीननंतर रश्मिका खूप रडली होती. रश्मिका म्हणाली, “हा संपूर्ण सीन एकाच टेकमध्ये शूट करण्यात आला होता. सीनमध्ये काय करायचं आहे हे मला अजिबात माहिती नव्हतं. संदीपनं मला फक्त अशा परिस्थितीत एखादी व्यक्ती कशी वागेल याचा तू विचार कर आणि तूसुद्धा तशीच वाग, असं सांगितलं होतं आणि मीसुद्धा अगदी तसंच केलं. मला फक्त एवढंच आठवतंय.

## ऐश्वर्याने सांगितला गंमतीशीर किस्सा



ऐश्वर्या राय बच्चन आणि अभिषेक बच्चन हे बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल्सपैकी एक आहेत. २० एप्रिल २००७ मध्ये दोघांनी लग्नगाठ बांधली. गेल्या काही दिवसांपासून ऐश्वर्या व अभिषेकच्या घटस्फोटाची चर्चा चांगलीच रंगली होती. मात्र, दोघांनी सोशल मीडियावर एकत्र फोटो शेअर करत या चर्चांना पूर्णविराम दिला होता. दरम्यान ऐश्वर्याचा एक जुना व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये तिने तिच्या व अभिषेकच्या रोका विधीबाबत गंमतीशीर किस्सा सांगितला आहे.ऐश्वर्या रायचा हा व्हिडिओ एका फॅन पेजने त्याच्या इंस्टाग्राम हँडलवर शेअर केला आहे. एका मुलाखती दरम्यानचा हा व्हिडीओ आहे. दरम्यान या मुलाखतीत तिने तिच्या व अभिषेकच्या लग्नाच्या विधीसंबंधीत किस्सा सांगितला आहे. ऐश्वर्या म्हणाली, “माझ्या व अभिषेकच्या रोका समारंभासाठी जेव्हा अभिषेकचे कुटुंबीय माझ्या घरी येत असल्याचे मला समजले तेव्हा मला आश्चर्य वाटलं. अचानकपणे होणारा हा रोका विधी हे माझ्यासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी खूप आश्चर्यकारक होता. कारण आमच्या कुटुंबात कोणालाच या विधीचा अर्थही माहिती नव्हता.”ऐश्वर्या पुढे म्हणाली, “माझं कुटुंब साऊथ पद्धतीचे कुटुंब आहे, त्यामुळे आमच्या कुटुंबात रोकासारखा कोणताही विधी नाही एक दिवस अचानक मला अभिषेकच्या घरून फोन आला की आम्ही येत आहोत. त्या दिवशी माझे वडीलही घरी नव्हते, ते गावाबाहेर होते आणि त्यांना यायला एक दिवस लागणार होता. मी अभिषेकला सांगितले की माझे वडील घरी नाहीयेत. यावर अभिषेक म्हणाला, ‘मी माझ्या घरच्यांना आता थांबवू शकत नाही, आम्ही निघालो आहोत आणि रस्त्यात आहोत. त्यादिवशी ते सगळे आमच्या घरी आले आणि आमचा रोका पार पडला.”

## सचिन तेंडुलकरने शूटिंगसाठी दिला नकार

प्रल्हाद कक्कर यांनी ९० च्या दशकात अनेक बॉलीवूड कलाकार व क्रिकेटपटूंबरोबर जाहिराती केल्या होत्या. त्या जाहिराती प्रचंड गाजल्या होत्या. त्यांनी त्यांचे ‘ॲडमन मॅडमॅन’ हे पुस्तक प्रकाशित केले. त्यानिमित्ताने त्यांनी काही आघाडीच्या स्टार्सबरोबर काम करतानाच्या काही आठवणी सांगितल्या. त्यांनी सचिन तेंडुलकर अवघा १६ वर्षांचा असताना त्याच्याबरोबर काम केलं होतं. त्यावेळचा एक किस्सा सांगितला. सचिन १६ वर्षांचा होता आणि भारतीय संघात त्याची निवड झाली होती. त्यानंतर त्याला ‘पेप्सी’ या ब्रँडच्या जाहिरातीसाठी साइन करण्यात आलं होतं. त्यावेळी प्रल्हाद यांनी सचिनची चेष्टा केली होती. त्यावेळी सचिन म्हणाला होता की तो शूट न करता घरी जाईल. त्यावेळी पेप्सीने एक स्पर्धा सुरू केली होती आणि स्पर्धेतील विजेत्याला खेळाडूंच्या बॉक्समध्ये टीमबरोबर बसण्याची संधी मिळायची. “मी म्हणालो की या स्पर्धेची विजेती एक मुलगी असेल आणि तू तिला हाताने पकडून खेळाडू बसतात, त्या बॉक्समध्ये न्यायचं आहेस. तो म्हणाला, ‘नाही, मी ते करू शकत नाही’. तर मी म्हणालो, ‘का नाही?’ तो म्हणाला, ‘कारण मी कधीच कोणत्याही मुलीला असं पकडलेलं नाही’,” असं प्रल्हाद म्हणाले.प्रल्हाद यांनी सचिनला विचारले की त्याच्या शाळेत मुली आहेत का? त्यावर सचिन म्हणाला की तो शाळेत कोणत्याही मुलीशी कधीच बोलला नाही. “तो म्हणाला, ‘नाही, मी ही जाहिरात करू शकत नाही. मी घरी जात आहे.



## परदेशी खेळाडूला १० वर्षांपासून डेट करतेय तापसी

अभिनेत्री तापसी पन्नूने तिच्या लव्ह लाइफबद्दल भाष्य केलं आहे. ती बॅडमिंटनपटू मॅथियस बोबरोबर दहा वर्षांपासून रिलेशनशिप आहे, परंतु ती तिच्या नात्याबद्दल फारसं बोलत नाही. तापसीने तिचं नातं कधीच लपवलं नाही. आता नुकत्याच एका मुलाखतीत तापसीला डेटिंगबद्दल विचारण्यात आलं. त्यावर तिने तिच्या रिलेशनशिपचा उल्लेख केला. सेलिब्रिटी झाल्यानंतर डेटिंग करणं कठीण आहे का? असं विचारल्यावर तापसी म्हणाली की ती १० वर्षांपासून एकाच व्यक्तीसोबत आहे म्हणून याचं उत्तर काय द्यावं हे तिला कळत नाही. राज शामानीशी बोलताना तापसी म्हणाली, “गेल्या १० वर्षांपासून मी त्याच व्यक्तीसोबत आहे, मी १३ वर्षांपूर्वी अभिनय करायला सुरुवात केली आणि ज्या वर्षी मी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं, त्याच वर्षी मी त्याला भेटले आणि तेव्हापासून मी त्याच्यासोबत आहे. माझा त्याला सोडण्याचा किंवा इतर कोणासोबत राहण्याचा कोणताही विचार नाही कारण मी नात्यात खूप आनंदी आहे.”काही महिन्यांपूर्वी तापसीने इन्स्टाग्रामवर ‘आस्क मी एनिथिंग’ सेशन ठेवलं होतं. तेव्हा एका चाहत्याने तिला विचारलं की ती कधी लग्न करणार आहे. यावर तापसी म्हणाली होती “मी अद्याप गरोदर नाही, त्यामुळे इतक्यात तरी नक्कीच लग्न करणार नाही.

# विराट कोहलीचे ऐतिहासिक शतक!

## सचिन तेंडुलकरसह डॉन ब्रॅडमनलाही टाकले मागे

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**यशस्वी जैस्वालनंतर विराट कोहलीनेही पर्थ कसोटी सामन्यात शानदार शतक झळकावून नवा इतिहास लिहिला आहे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी चहापानाच्या विश्रांतीनंतर कोहलीने शानदार पद्धतीने शतक पूर्ण केले. कोहलीने आपल्या कसोटी कारकिर्दीतील 30 वे शतक 143 चेंडूत पूर्ण केले. अशा प्रकारे कोहलीने गेल्या 1 वर्ष 4 महिन्यांपासून सुरू असलेला शतकाचा दुष्काळ संपवला. कोहलीचे मागील शतक वेस्ट इंडिजविरुद्ध जुलै 2023 मध्ये पोर्ट ऑफ स्पेन येथे झाले होते. आता या शतकाच्या जोरावर विराट कोहलीने सचिन तेंडुलकर आणि डॉन ब्रॅडमन यांना मागे टाकले आहे .**



भारताने दुसऱ्या डावात विराट कोहलीचीच्या शतकाच्या जोरावर 6 बाद 487 धावा करून डाव घोषित केला. विराट कोहलीच्या शतकाची सर्वांनाच प्रतीक्षा होती. त्याने शतक झळकावताच भारतीय ड्रेसिंग रुमने डाव घोषित करण्याचा निर्णय घेतला. विराटने 143 चेंडूत 100 धावांची नाबाद खेळी केली. त्याने आपल्या खेळीत आठ चौकार आणि दोन षटकार मारले. टीम इंडियाचा दिग्गज फलंदाज विराट कोहलीने चाहत्यांची प्रदीर्घ प्रतीक्षा संपवत अखेर आपले 81 वे आंतरराष्ट्रीय शतक झळकावले आहे.विराट कोहली आता ऑस्ट्रेलियात ऑस्ट्रेलियन संघाविरुद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावणारा परदेशी खेळाडू ठरला आहे. कोहलीने जॅक हॉब्सचा 9 शतकांचा विक्रम मोडला. कोहलीच्या नावावर आता ऑस्ट्रेलियात कांगारू संघाविरुद्ध तिन्ही फॉरमॅटमध्ये 10 शतके आहेत. इतकेच नाही तर कोहलीने सर्वाधिक कसोटी शतके झळकावण्याच्या बाबतीत महान ऑस्ट्रेलियन फलंदाज डॉन ब्रॅडमनलाही मागे टाकले आहे. ब्रॅडमनने 29 कसोटी शतके झळकावली होती तर कोहलीच्या नावावर आता 30 कसोटी शतके आहेत.ऑस्ट्रेलिया विरुद्ध पर्थ येथे सुरु असलेल्या बॉर्डर गावस्कर मालिकेतील पहिल्या सामन्यात विराट कोहलीने धमाकेदार शतक झळकावून ही मोठी कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक शतकांबद्दल बोलायचे झाले, तर विराट कोहलीच्या नावावर आता 81 शतके आहेत. या यादीत सचिन तेंडुलकर पहिल्या क्रमांकावर आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक 100 शतके करण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. या यादीत विराट कोहली 81 शतकांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉन्टिंग 71 शतकांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे.भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना पर्थमध्ये खेळवला जात आहे. दुसऱ्या डावात फलंदाजी करताना भारताने कांगारूंच्या गोलंदाजांना आपल्यापुढे गुडघे टेकायला भाग पाडले. भारतीय डावादरम्यान, स्टार फलंदाज विराट कोहलीने मारलेला षटकार सीमारेषेवर उपस्थित असलेल्या सुरक्षा रक्षकाला लागला. त्याला वेदना होत असल्याचे दिसून आले. ज्याचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे.विराट कोहलीला पहिल्या डावात केवळ ५ धावा करता आल्या होत्या. मात्र दुसऱ्या डावात त्याने शानदार अर्धशतक झळकावले आहे. खरे तर विराट कोहलीने पर्थच्या मैदानावर कसोटी कारकिर्दीतील २९वा षटकार ठोकताच सर्वजण त्याच्या शॉटचे कौतुक करत होते, मात्र स्टेडियमच्या एका सुरक्षा रक्षकाला वेदना होत असल्याचे पाहून सगळेच शांत झाले. ही घटना भारतीय संघाच्या डावाच्या १००.४ षटकांत घडली, जेव्हा कोहलीने मिचेल स्टार्कच्या चेंडूवर थर्ड मॅनला षटकार मारला. त्याचा व्हिडीओ व्हायरल झाल आहे.चेंडू थेट सीमारेषेच्या दोरीला आदळला आणि नंतर तो सुरक्षा रक्षकाच्या डोक्याला लागला. त्यावेळी सुरक्षारक्षकला वेदना होत असलेला दिसत होते. चेंडू लागताच त्याने टोपी काढून डोक्यावर हात ठेवला.

### विराटच्या षटकाराने सुरक्षारक्षक जखमी

त्याला वेदना होत असल्याचे पाहून ऑस्ट्रेलियन संघाच्या खेळाडूंनी त्याच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि लगेचच वैद्यकीय पथक त्याच्याकडे पोहोचले. यावेळी विराट कोहलीही थोडा चिंतेत दिसला आणि हातवारे करून गार्डच्या तंदुरुस्तीची विचारपूस करताना दिसला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. भारतीय संघासाठी केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांच्यात २०१ धावांची भागीदारी झाली. दुसऱ्या डावात यशस्वी जैस्वालने २९७ चेंडूंचा सामना करत १५ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने १६१ धावा केल्या. केएल राहुल ७७ धावा करून बाद झाला. देवदत्त पडिक्कलने २५ धावा केल्या. भारताने ४५६ धावांची आघाडी घेतली. भारताने १२५ षटकांनंतर ५ बाद ४१० धावा केल्या आहेत. सद्या विराट ६६ आणि वॉशिंग्टनने २९ धावांवर खेळत आहेत.

# लायनने टाकलेल्या जाळ्यात अडकला पंत

## अनुभवी ऑफस्पिनर नॅथन लायनने ऋषभ पंतला बाद केले

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात बॉर्डर गावस्कर ट्रॉफीचा पहिला कसोटी सामना ऑप्टस क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जात आहे. या सामन्यातील भारतीय संघाच्या दुसऱ्या डावात अनुभवी ऑफस्पिनर नॅथन लायनने ऋषभ पंतला बाद केले. लायनने अतिशय हुशारीने पंतला बाद केले. पंत अवघी एक धाव करून पॅव्हेलियनमध्ये परतला. या स्फोटक खेळाडूला लायनने ज्याप्रकारे आपल्या जाळ्यात अडकवले, त्याचा व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे.**



वास्तविक, भारतीय संघाच्या दुसऱ्या डावातील ९६ वे षटक अनुभवी ऑफस्पिनर नॅथन लायन टाकत होता. त्यावेळी ऋषभ पंत त्याच्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर स्ट्राइकवर होता. लायनने चेंडू टाकल्यानंतर ऋषभ पुढे सरसावत मोठा फटक खेळण्यासाठी गेला, पण पंत क्रीजबाहेर येऊन खेळण्याचा प्रयत्न करणार याची कल्पना लायनला आधीच होती, म्हणून त्याने चेंडू थोडा बाहेर टाकला आणि ऋषभ पंत चेंडूपर्यंत पोहोचणार नाही याची काळजी घेतली.यानंतर चेंडू खेळपट्टीवर पडताच क्षणी आणखी बाहेर वळला. चेंडू बाहेर गेल्याने ऋषभ पंत तिथपर्यंत पोहोचू शकला नाही. तसेच तो क्रीजपासून खूप दूर आला होता, ज्यामुळे तो स्टंप आऊट झाला होता. विशेष म्हणजे पंत त्याच्या कसोटी कारकिर्दीत फक्त दुसऱ्यांदा स्टंप आऊट झाला आहे. यापूर्वी २०२१ मध्ये त्याला जेक लीचने अशा प्रकारे बाद केले होते. ऋषभ पंतने नॅथन लायनला खूप त्रास दिला आहे. या दिग्गज गोलंदाजाविरुद्ध तो अनेकदा आक्रमक शैलीत खेळतो, पण आज त्याचा प्रयत्न फसला.

### भारतीय संघाचा दुसरा डाव

तिसऱ्या दिवशी चहापानापर्यंत भारताने दुसऱ्या डावात पाच गडी गमावून ३५९ धावा केल्या होत्या. सध्या विराट कोहली ४० आणि वॉशिंग्टन सुंदर १४ धावांसह खेळत आहेत. दोघांमध्ये आतापर्यंत ३८ धावांची भागीदारी झाली आहे. भारताने आज बिनबाद १७२ धावांवरुन खेळण्यास सुरुवात केली होती. केएल राहुलच्या रूपाने टीम इंडियाला पहिला धक्का बसला. तो ७७ धावा करून बाद झाला.